# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:29.12.2025** **वार:सोमवार**

---

1. भारताला जागतिक सेवा महाकेंद्र बनवण्यासाठी सर्व राज्यांनी व्यवसायसुलभ धोरणांना चालना द्यावी, पंतप्रधानांचं आवाहन. मुख्य सचिवांच्या पाचव्या राष्ट्रीय परिषदेचा काल समारोप
2. नवी उमेद आणि नव्या संकल्पांसह 2026 मध्ये पुढे जाण्यासाठी देश सज्ज असल्याचं पंतप्रधानांचं मन की बात मध्ये प्रतिपादन
3. देशातील आरोग्य परिसंस्था निर्मितीसाठी सरकार बरोबरच डॉक्टरांची भूमिकाही तितकीच महत्वाची, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचं प्रतिपादन आणि
4. श्रीलंकेविरुद्ध वीस षटकांच्या चौथ्या सामन्यातही भारतीय महिला संघाचा विजय.

**<u>पंतप्रधान-सचिव परिषद</u>**

भारताला जागतिक सेवा महाकेंद्र बनवण्यासाठी सर्व राज्यांनी उत्पादकतेला प्रोत्साहन द्यावं तसंच व्यवसायसुलभ धोरणांना चालना द्यावी असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. मुख्य सचिवांच्या पाचव्या राष्ट्रीय परिषदेत ते काल नवी दिल्लीत बोलत होते. प्रत्येक राज्यानं या परिषदेत झालेल्या विचारविनिमयाला अनुसरुन 10 वर्षांसाठीचा कृती आराखडा तयार केला पाहिजे असं त्यांनी यावेळी सांगितलं. लवकरच देशाचं राष्ट्रीय उत्पादकता अभियान सुरू होणार आहे. प्रत्येक राज्यानं त्याला प्राधान्य द्यावं आणि जागतिक गुंतवणुकदारांना आकर्षित करतील अशा पायाभूत सुविधा उभाराव्यात असं मोदी म्हणाले. मेड इन इंडिया म्हणजे दर्जा असं समीकरण तयार झालं पाहिजे. आयातीवरचं अवलंबित्व कमी करण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनांनी मिळून देशांतर्गत उत्पादनासाठी शंभर उत्पादनांचा शोध घ्यावा असं आवाहन त्यांनी केलं. भारत जगाचा अन्नदाता बनू शकतो. त्यासाठी उच्च दर्जाच्या शेती, दुग्धोत्पादन, मत्स्यव्यवसाय यांनी निर्यातीवर लक्ष केंद्रित करुन सुधारणा कराव्यात असं त्यांनी सांगितलं. तीन दिवसांच्या या परिषदेची काल सांगता झाली. परिषदेत बाल शिक्षण, शालेय शिक्षण, कौशल्यविकास, उच्च शिक्षण तसंच क्रीडा आणि कलाकौशल्य या मुद्द्यांवर भर देण्यात आला.

**<u>मन की बात</u>**

नव्या वर्षाची चाहूल लागताना, सरत्या 2025 वर्षाने देशवासियांना अनेक अभिमानाचे क्षण दिले. देशाच्या सुरक्षिततेपासून ते क्रीडा क्षेत्रापर्यंत, शास्त्रीय प्रयोगशाळांपासून जागतिक व्यासपीठांपर्यंत प्रत्येक ठिकाणी भारतानं आपली प्रतिमा उंचावली. या वर्षात नैसर्गिक आपत्तींनी परीक्षा घेतली मात्र आता नवीन वर्षात नवी उमेद आणि नव्या संकल्पांसह पुढे जाण्यासाठी देश सज्ज असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आकाशवाणीवरच्या 'मन की बात' या कार्यक्रमातून केलं. या कार्यक्रमाचा हा 129 वा भाग होता. ऑपरेशन सिंदूर हे अभिमानाचं प्रतीक असून देशाच्या सुरक्षिततेबाबत तडजोड न करण्याविषयीची ठाम भूमिका भारतानं स्पष्ट केल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं. अंतराळ क्षेत्रात शुभांशू शुक्लांच्या रूपात भारतानं आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकापर्यंत झेप घेतली.

स्वदेशीचा पुरस्कार अधिक परिणामकारक झाला. 12 जानेवारीला स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीच्या निमित्तानं 'राष्ट्रीय युवा दिवस' आणि यंग लीडर्स डायलॉगचं आयोजन होणार असल्याचंही त्यांनी सांगितलं. मणिपूरच्या मोईरांगथेम सेठनं दुर्गम खेड्यातल्या विजेच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी सोलर पॅनेल बसवण्याचं अभियान सुरू केलं आणि आज त्या भागात शेकडो घरांमध्ये सौर उर्जा पोचली आहे अशी माहिती त्यांनी दिली. जम्मू काश्मीरमधील जेहनपोरा भागातील तीन पुरातन उंच टेकड्या या बौद्ध स्तूप असल्याचं समोर आल्यामुळे काश्मीरचा दोन हजार वर्ष जुना गौरवशाली इतिहास समोर आल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. काशी तामिल संगमम, मणिपुरी उत्पादनं, कच्छचा रण उत्सव याबद्दलही त्यांनी विस्तृत माहिती दिली. नागरिकांच्या सूचना, प्रयत्न या माध्यमातून भारताचा संकल्प नक्कीच पूर्णत्वास जाईल असा विश्वास व्यक्त करून फिट इंडिया मूवमेंट मध्ये स्वतःला तंदुरूस्त राखा असं आवाहन करत पंतप्रधानांनी मन की बात चा समारोप केला.

**<u>मुर्मु-दौरा</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी काल कर्नाटकातील कारवारमधल्या कदंब नौदलतळाला भेट दिली. त्यानंतर राष्ट्रपतींनी आएनएस वाघशील पाणबुडीतून प्रवास केला. माजी राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम यांच्यानंतर पाणबुडीतून प्रवास करणाऱ्या त्या दुसऱ्या राष्ट्रपती आहेत.

**<u>संरक्षण सिद्धता 2025</u>**

2025 हे वर्ष भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या धोरणाला निर्णायक स्वरूप देणारं वर्ष म्हणून ओळखलं जाईल. 'सुधारणांचे वर्ष' या विशेष मालिकेत, आज 2025 मध्ये संरक्षण क्षेत्रात भारतानं घेतलेल्या ठाम निर्णयांबाबत ऐकुया माझ्या सहकारी विजयालक्ष्मी साळवी यांच्याकडून...

**जागतिक पातळीवर अनिश्चिततेचं वातावरण असतानाही 2025 मध्ये भारतानं संरक्षण क्षेत्रात अत्यंत आत्मविश्वासाने, महत्त्वपूर्ण आणि ठाम निर्णय घेतले. राष्ट्रीय सुरक्षा आणि सार्वभौमत्वाचं कोणत्याही परिस्थितीत रक्षण केलं जाईल असा स्पष्ट संदेश भारतानं दिला. दहशतवादाला कठोर कारवाईतून उत्तर दिलं जाईल हे ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून संपूर्ण जगाला ठणकावून सांगितलं. यापुढे भारत दहशतवादाला ठाम प्रत्युत्तर देईल, आण्विक हल्ल्यांच्या धमकीला बळी पडणार नाही, दहशतवादी आणि दहशतवाद्यांना पाठीशी घालणाऱ्यामध्ये भेद केला जाणार नाही, दोन देशांमधील परस्पर संवादात दहशतवाद हाच पहिला मुद्दा असेल, दहशतवाद आणि वाटाघाटी एकाच वेळी होणार नाहीत हे पाच मुद्दे सांगून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताची दहशतवादविरोधातील भूमिका ठामपणे मांडली. ऑपरेशन सिंदूरमध्ये वापलेली ब्राम्होस क्षेपणास्त्र आणि अन्य बहुतांश संरक्षण सामुग्री स्वदेशी बनावटीची होती. यंदाच्या अर्थसंकल्पात केंद्र सरकारनं संरक्षण क्षेत्रासाठी मोठी आर्थिक तरतूद केली आहे. संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरतेसाठी आणि आधुनिकीकरणासाठी 2025 मध्ये 4 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या अधिग्रहण प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. एकंदरीतच लष्कर, नौदल आणि हवाई दलांच्या सज्जतेच्या दृष्टीनं 2025 हे वर्ष महत्त्वपूर्ण ठरलं आहे.**

**<u>शाह-IMA</u>**

विकसित भारत घडवण्यासाठी भक्कम आरोग्य परिसंस्था आवश्यक आहे आणि त्यामध्ये डॉक्टरांची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहणार आहे असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी अहमदाबाद इथं केलं. अखिल भारतीय वैद्यक परिषद म्हणजे IMA च्या राष्ट्रीय संमेलनाला त्यांनी काल संबोधित केलं. आयुष्मान भारत

योजनेनं देशात मोठा बदल घडवून आणला, कोरोना काळात डॉक्टरांनी जीवाची पर्वा न करता दिलेली सेवा हे देशाचं सर्वात मोठं मानवी भांडवल आहे असंही त्यांनी नमूद केलं. देशातील आरोग्य पायाभूत सुविधा, सर्वांगीण दृष्टिकोनातून बांधल्या जात आहेत असं ते म्हणाले. वैद्यकीय क्षेत्रात आयएमए नं सर्वाधिक योगदान दिलं असून आरोग्य परिसंस्था अधिक बळकट करण्यासाठी IMA नं पुढाकार घ्यावा, असं आवाहन त्यांनी केलं. या दौऱ्या दरम्यान नवा वंजार इथं 330 कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन शाह यांनी केलं. ते आज गुवाहाटीच्या एका दिवसाच्या दौऱ्यावर जाणार आहेत.

**<u>ट्रंप-झेलेन्सकी</u>**

युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी काल रात्री फ्लोरिडा इथं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भेट घेतली. रशिया आणि युक्रेन हे दोन्ही देश युद्ध संपवण्याच्या पक्षात असून शांतता प्रस्थापित करण्यासाठीच्या वाटाघाटीत बरीच प्रगती झाली आहे, या वाटाघाटी काही आठवड्यात पूर्ण होण्याची अपेक्षा आहे असं ट्रम्प यांनी या भेटीनंतर पत्रकारांना संबोधित करताना सांगितलं. या भेटीपूर्वी ट्रम्प यांनी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याशी जवळपास अडीच तास फोनवरून चर्चा केली.

**<u>अरावली</u>**

अरावली पर्वत रांगांच्या नव्या व्याख्येवरून पर्यावरण तज्ज्ञ आणि सामाजिक संघटनांनी व्यक्त केलेल्या चिंतेची सर्वोच्च न्यायालयानं दखल घेतली असून, सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जे. के. माहेश्वरी आणि ए.जी. मसीह यांचा समावेश असलेल्या सुट्टी-कालीन पिठासमोर आज या प्रकरणाची सुनावणी होणार आहे. अरावली पर्वतरांगांच्या नव्या व्याख्येवर मोठ्या प्रमाणात निषेध आणि आक्षेप नोंदवला गेल्याच्या पार्श्वभूमीवर न्यायालयानं हा हस्तक्षेप केला.

**<u>हवामान</u>**

उत्तरेकडील राज्ये आणि ईशान्य भारतात आज दाट धुक्याची शक्यता आहे. छत्तीसगड, हरियाणा, चंदीगड, दिल्ली, मध्य प्रदेश आणि पंजाबमध्ये थंडीची लाट येण्याचा अंदाज असून उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडमध्येही थंडी कायम राहील असं हवामान विभागानं म्हटलं आहे.

**<u>क्रिकेट</u>**

भारतीय महिला क्रिकेट संघानं काल श्रीलंकेविरुद्धचा 20 षटकांचा चौथा सामना 30 धावांनी जिंकला. तिरुअनंतपुरम इथं झालेल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना भारतीय महिलांनी 20 षटकांत 221 धावा केल्या. त्याला उत्तर देताना श्रीलंकेला 20 षटकांत 191 धावा करता आल्या. 87 धावा करणारी स्मृती मानधना सामनावीर ठरली. तिनं आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधल्या दहा हजार धावांचा टप्पा पार केला.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.